03 DEC 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योजक होण्यासाठी सातत्य आवश्यक

## शिवाजी विद्यापीठातील 'बिझनेस मीट'मध्ये मान्यवरांचे मत




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात झालेल्या बिझनेस मिट उपक्रमात इनोव्हेटिव्ह बिझनेसमन या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

कोल्हापूर, ता. २ : उद्योजक होण्यासाठी कल्पकता लागतेच, तसेच प्रयत्नातील सातत्यही आवश्यक आहे, असे मत उद्योजकांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठात झालेल्या 'बिझनेस मीट' उपक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यशवंतराव चव्हाण रुरल डेव्हलपमेंट विभाग, 'आमचा गाव आमचा विकास' यांनी संयुक्तपणे उपक्रम राबविला. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे जितेंद्र शहा आणि डॉ. एन. सी. माळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी 'सर्वोत्तम ऊर्जा'चे दीपक पाटील, 'नीना फूडस'च्या वैजयंती काळे, 'मनोरमा इन्फोसोल्युशन'च्या अश्विनी दानिगोंड, 'अव्दय इंडस्ट्री'चे नामदेव माळी, 'आनंद इंजिनिअरिंग'चे संदीप पाटील, 'महालक्ष्मी क्रिएशन'च्या श्वेता बोंद्रे, 'ओंकार होंडा'चे अमोल सरनाईक यांनी संवाद साधला. विद्यार्थ्यांमधून नवउद्योजक घडण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. इनोव्हेटिव्ह बिझनेसमन विशेषांकाचे प्रकाशन झाले.

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात इनोव्हेटिव्ह बिझनेस विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी व्यवसाय सांभाळत सामाजिक बांधिलकी जपणारे अमोल सरनाईक यांचा सत्कार करताना प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व इतर मान्यवर.

# विद्यापीठात सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यावसायिकांचा सत्कार

**कोल्हापूर :** यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुलर मॅनेजमेंट शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि आमचा गाव आमचा विकास यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ येथे बिजनेस मीट आणि इनोव्हेटिव्ह बिझनेस मॅन या विशेष अंकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. व्यवसायाबरोबर सामाजिक बांधिलकी जपत व्यवसाय मोठा करणारे अमोल सरनाईक यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे ललित गांधी उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी प्रकुलगुरू डॉ. पी. एस.पाटील होते. यावेळी इनोव्हेटिव्ह बिझनेस मॅन यांचा सन्मान करण्यात आला. तसेच यावेळी सर्व उद्योजकांनी आपली यशोगाथा विद्यार्थ्यांपुढे सांगितल्या. तसेच त्यांच्या शंकांचे निरसन सुद्धा केले.

लोकमत

# शाहू कॉलेजमध्ये सोमवारी महोत्सव

कोल्हापूर : येथील राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये सोमवारी (दि. ५) जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव होणार आहे. शिवाजी विद्यापीठाने या कॉलेजची महोत्सवासाठी निवड केली. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था आणि अधिविभागातील पदवीस्तरावरील विद्यार्थी या महोत्सवात सहभागी होतील. सर्वोत्कृष्ट तीन स्पर्धकांना रोख बक्षिसे आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येईल. सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. जास्तीत जास्त संशोधक विद्यार्थ्यांनी या महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी केले.

पुढारी

# नॉनस्टिक वस्तूंच्या अतिवापराचे यकृतावर दुष्परिणाम : डॉ. आपटे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या नॉनस्टिक वस्तूंमुळे यकृताचे विकार उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांचा अतिवापर टाळावा, असा सल्ला अमेरिकेतील कान्सास विद्यापीठातील फार्मेकॉलॉजी-टॉक्झिकॉलॉजी विभागातील शास्त्रज्ञ डॉ. उदयन आपटे यांनी दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात 'डेसिफरिंग मॅकेनिझम्स ऑफ लीव्हर टॉक्झिसिटी इन्ड्युस्ड बाय पॉलीफ्लुरोअल्काईल सबस्टन्सेस युजिंग ग्लोबल जीन एक्स्प्रेशन एनालिसीस' या विषयावरील विशेष व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. आपटे म्हणाले, नॉनस्टिक भांडी, रेनकोट, वॉटरप्रूफ मेकअप उत्पादने व स्टेनप्रूफ कपड्यांच्या अतिवापरामुळे यकृताचे आजार होऊ शकतात. पी.एफ.ए.एस. रसायनांच्या अतिवापरामुळे रोगप्रतिकारक शक्ती, प्रजननक्षमता, गर्भवाढ आणि यकृतावर



दुष्परिणाम होतात. सात वर्षांच्या संशोधनानंतर पी.एफ. ए. एस. चा अर्धायुकाल (हाफ लाईफ पीरियड) तीन वर्षांचा असून त्याचे विघटन लवकर होत नाही. त्याचा यकृताशी संबंध आल्यास यकृताला सूज येणे, यकृतात चरबी साठणे व हायपर कोलेस्ट्रोलेमियाचा धोका उद्भवतो.

प्रास्ताविक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी केले. अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. एन. ए. कांबळे यांनी आभार मानले. यावेळी डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. मेघनाद जोशी, डॉ. वसंत पाटोळे, डॉ. नितीन पोटफोडे, सुभाष मुंजे, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. एस. आर. यंकंची, डॉ. एम. पी. भिलावे उपस्थित होते.

0 3 DEC 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोन्याचा अंश असल्याच्या कोल्हापूरच्या अधिकाऱ्याचे संशोधन ३४ वर्षांनी मान्यतेच्या मार्गावर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भूगर्भात सोने आणि प्लॅटिनमसह मौल्यवान धातू असल्याचा दावा कोल्हापुरात कार्यरत असलेले खनिकर्म विभागाचे तत्कालीन अधिकारी रामसिंग हजारे यांनी १९८८ साली केला होता. या त्यांच्या संशोधनाला ३४ वर्षांनंतर मान्यता मिळण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच सिंधुदुर्ग व चंद्रपूरमधील खाणींतून सोने दडले असल्याचे जाहीर केले. त्यामुळे आता पुढच्या कार्यवाहीकडे लक्ष लागून राहिले आहे.

कोकणात होत असलेल्या खाणकामात सोन्याचा अंश असल्याची पहिली बातमी १९८८ साली प्रसिद्ध झाली. या ३४ वर्षांच्या प्रवासात अनेक घटना, घडामोडी घडल्या. ज्यांनी हे सारे सोने भारत सरकारच्या तिजोरीत जमा व्हावे, यासाठी प्रयत्न केले. त्याची दखल कोणीच घेतली नाही. अखेर ३४ वर्षांनी या सोन्याच्या शोधाची आता शासकीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे.

गोव्यापासून ते कर्नाटकपर्यंत जे खाणकाम सुरू होते. त्यामध्ये सोने, प्लॅटिनमसह मौल्यवान धातू असल्याचा दावा कोल्हापुरात खनिकर्म विभागात अधिकारीपदावर असलेल्या रामसिंग हजारे यांनी केला होता. अनेक प्रयोगशाळांत तेथील उत्खननाची चाचणी घेऊन त्यांनी हे सप्रमाण सिद्ध करण्याचा सातत्याने प्रयत्न केला होता. १९८८ च्या बातमीनंतर अनेकांचे त्याकडे लक्ष लागले.

काही काळानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संदुरा नावाच्या पट्ट्यात अधिक प्रमाणात सोन्याचे प्रमाण असल्याचे व काही प्रमाणात प्लॅटिनमसह अन्य धातू असल्याचे स्पष्ट झाल्याचा दावा करण्यात आला. या संशोधनाला मान्यताप्राप्त प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र असले पाहिजे, तेव्हाच आपला दावा सिद्ध करता येईल, या भूमिकेतून पुढे प्रयत्न सुरू झाले. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून कळणे, तिरोडा, रेड्डी आदी परिसरातील उत्खनन तपासण्याची तयारी शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू प्रा. एम. जी. ताकवले यांनी दाखविली. त्यानंतर यासाठीची प्रक्रिया शिवाजी विद्यापीठाने सुरू केली. स्वतः ताकवले यांच्या पुढाकाराने खाणीतून नमुने घेण्यात आले. त्याची शिवाजी विद्यापीठाच्या प्रयोगशाळेत तपासणी केल्यानंतर त्यातून हजारे यांच्या संशोधनाना बळकटी पुरविणारे निकाल समोर आले. मात्र, संशोधक एका निकालावर थांबत नाहीत. प्रा. ताकवले यांनी हे नमुने आणि शिवाजी विद्यापीठाच्या प्रयोगशाळेतील निष्कर्ष नामांकित अशा 'कोलार गोल्ड फिल्ड' या सोन्याच्या खाणीच्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले. त्यांनीही शिवाजी विद्यापीठाच्या निष्कर्षावर शिक्कामोर्तब केले.

या उत्खननात सोने, प्लॅटिनम यासह मौल्यवान धातू आढळतात, असा निष्कर्ष कोलार गोल्ड फिल्डच्या प्रयोगशाळेने दिला. कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनचे तत्कालीन अध्यक्ष शिवाजीराव देसाई यांनीही यासाठी प्रयत्न केले. हा पाठपुरावा करण्यात पत्रकार उदय कुलकर्णी यांचाही सहभाग होता. प्रा. ताकवले यांनी या उत्खननाच्या निष्कर्षाची प्रत त्यांना दिली होती.

या निष्कर्षाचा शासकीय पातळीवर पाठपुरावा केला. तत्कालीन मंत्री, अधिकारी यांच्याकडे त्याचे अहवाल पाठविण्यात आले. मात्र, गेल्या ३४ वर्षांत याकडे दुर्लक्षच करण्यात आले. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच हा मुद्दा पुढे आणल्याने यापुढच्या काळात याबाबत प्रत्यक्ष पावले पडण्याची अपेक्षा आहे. विशेष म्हणजे, कोलारच्या खाणीतून सोने काढण्यासाठी एक ते दीड किलोमीटर खोलवर जावे लागते; मग अत्यंत कमी खोलीवर व कोलारपेक्षाही अधिक प्रमाणात एक टन उत्खननातून सोने मिळत असल्याचे संशोधनातून समोर आल्याचा दावा केला आहे.

0 3 DEC 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा १४० जणांचा संघ रवाना

## आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव

स्थानिक क्रीडा वृत्त

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : औरंगाबाद येथे होणाऱ्या २४ व्या आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाचा १४० खेळाडू असणारा संघ रवाना झाला. शनिवार (ता. ३) ते बुधवार (ता. ७) या कालावधीत हा क्रीडामहोत्सव होणार आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत या संघाला शुभेच्छा देण्यात आल्या.

या महोत्सवात दहा संघ व्यवस्थापक आणि दहा प्रशिक्षक यांच्याबरोबरच एकूण १२० खेळाडू विविध क्रीडा प्रकारांत सहभागी होणार आहेत. यामध्ये खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, ॲथलेटिक्स आदी खेळांचा समावेश आहे. या निमित्ताने स्पर्धेत सहभागी खेळाडूंना शुभेच्छापर कार्यक्रम विद्यापीठात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाला. खेळाडूंनी उणिवांवर मात करत क्षमतांचे संवर्धन करावे आणि शिवाजी विद्यापीठाचे नाव उंचवावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. खेळाडूंनी शारीरिक क्षमतेबरोबरच मानसिक क्षमताही सातत्याने वृद्धिंगत करीत न्यावी, जेणेकरून खेळाकडे अधिक जागरुकतेने पाहता येऊ शकेल, असे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ खेळावर लक्ष केंद्रित करून यंदा सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त करण्याच्या दिशेने प्रयत्न करावेत, असे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.



ग्रुप लीडर डॉ. सुनील चव्हाण आणि विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला. स्वागत व प्रास्ताविक क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले. मार्गदर्शक डॉ. एन. डी. पाटील, डॉ. चव्हाण आणि खेळाडू प्राजक्ता चव्हाण, ऋतुजा मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. संजय पाटील यांनी आभार मानले. डॉ. लीना पाटील यांनी सूत्रसंचालन केले. पृथ्वीराज सरनाईक यांनी संयोजन केले.

सकाळ

# आनंदी महाविद्यालयाचे कुस्ती स्पर्धेत यश

**सकाळ वृत्तसेवा**

पुनाळ, ता. २ : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरअंतर्गत विभागीय कुस्ती स्पर्धा मुरगूड येथे झाल्या. लोकनेते सदाशिवराव मंडलिक साई आखाडा येथे झालेल्या या स्पर्धेमध्ये आनंदी महाविद्यालयाने विविध गटांत यश मिळवले.

फ्री स्टाईल प्रकारात १२ गुणांसह द्वितीय क्रमांकासह जनरल चॅम्पियनशिप महाविद्यालयाला मिळाली. अमोल बाबूराव बोंगार्डे याने ५७ किलो वजनी गटामध्ये सुवर्णपदक मिळवले. प्रवीण कृष्णात वडगावकर याने याच गटात रौप्यपदक मिळवले.

शंकर आप्पा टिकोळे याने ७९ किलो वजनी गटामध्ये रौप्यपदक व तुषार खाशाबा ठोंबरे याने १२५ किलो वजनी गटामध्ये रजतपदक मिळवले. या सर्वांची कराड या ठिकाणी होणाऱ्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यासाठी त्यांना संस्थाध्यक्ष व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सतीश देसाई, सचिव व प्र. प्राचार्य डॉ. विद्या देसाई व प्रशिक्षक, आई-वडील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले.

तरुण भारत

# आंतर विद्यापीठ लॉन टेनिस स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ पात्र

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

मुंबई विद्यापीठ मुंबई येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पश्चिम विभागीय स्पर्धा २७ ते ३० नोव्हेंबर अखेर संपन्न झालेल्या पश्चिम विभागीय लॉन टेनिस स्पर्धेत एकूण ५४ विद्यापीठांनी सहभाग नोंदवला. यामध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने एकूण पाच सामने जिंकून दिल्ली सोनीपत येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये स्थान मिळविले.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पश्चिम विभागीय स्पर्धेत प्रथम एलएन आयसीपीई ग्वालियर सोबत सामना खेळला. त्यामध्ये दोन एक या फरकाने विजय प्राप्त केला. दुसऱ्या सामन्यात एमजी एसयु बिकानेर सोबत दोन एकच्या फरकाने विजय मिळवला. तसेच तिसरा सामना के एस व्ही गांधीनगर सोबत दोन शून्य या फरकाने विजय मिळवला. चौथा सामना आयएमव्ही ग्वालियर सोबत अटीतटीच्या झालेल्या सामन्यात दोन एक विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीत एचएनजीयुयु पाटण सोबत दोन शून्य या फरकाने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला. तिसऱ्या नंबर साठी झालेल्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



**कोल्हापूर : टेनिस स्पर्धेत पात्र झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.**

संघास २ –१ या फरकाने हरवून दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघाने स्थान निश्चित केले. शिवाजी विद्यापीठ संघाकडून संदेश कुरले व पार्थ पाटील यांचा विजय मिळवून देण्यासाठी मोलाचा वाटा उचलला. ओमकार इस्लामपुरे, तेजस कुलये, सर्वजीत लांडगे या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. या खेळाडूंना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ विलास शिंदे, डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन, व्यवस्थापक प्रा. मुजफ्फर लगीवाले, मनाल देसाई यांचे मार्गदर्शन लाभले

0 3 DEC 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोन्याच्या खाणीसाठी ऐंशीपासून पाठपुरावा

## सिंधुदुर्गात शोध; रामसिंग हजारे, उदय कुलकर्णी यांच्यासह अनेक कोल्हापूरकरांचा हातभार

संदीप आडनाईक
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाराष्ट्रात विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यात सोन्याच्या खाणी असल्याचा ठाम दावा १९८० पासून सातत्याने कोल्हापूर खणीकर्म विभागाचे अधिकारी रामसिंग हजारे आणि ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी हे करत आहेत. त्यांना विज्ञान प्रबोधिनी, शासकीय कर्मचारी संघटना,कोल्हापूर इंजिनिअरींग असोशिएशनचे अध्यक्ष शिवाजीराव देसाई यांची साथ मिळाली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु असताना डॉ.एम.जी.ताकवले यांनी स्वतः नमुने घेऊन खातरजमा केली होती आणि आपला अहवाल तत्कालिन प्रभारी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि केंद्रीय खाणकाम मंत्री श्रीपाद नाईक यांना सादर केला होता. त्याच्या मूळ प्रती अद्याप उदय कुलकर्णी यांच्याकडे आहेत.

सिंधुदुर्ग जिल्हातील भूगर्भातही सोने असल्याची शक्यता पाहून राज्याच्या खणीकर्म विभागाने चाचणी सुरु केली आहे. शिवाय दोन ठिकाणी सोन्याच्या खाणी असल्याचेही विभागाने जाहीर केले आहे. परंतु १९८० मध्ये सिंधुदुर्ग जिल्हातील कळणे आणि रेडीज येथील खाणीत सोन्याचे धातू आढळल्याचा अहवाल देण्यात आला होता. यासोबतच बेगमपुर आणि मंगळवेढ्याच्या नदीपात्रातही मौल्यवान धातूचे अंश आढळले होते. मात्र, आर्थिक कारणांमुळे यावर पुढची कार्यवाही झालेली नाही.

बेगमपुर येथील वाळू आणि चार पोती वडाच्या पाने जाळल्यानंतर ०.६ मिलिग्रॅम सोने आढळले होते. यासाठी कोल्हापूर इंजिनिअरींग असोशिएशनचे अध्यक्ष शिवाजीराव देसाई, कुलगुरु डॉ. एम. जी. ताकवले यांच्यामार्फत खणीकर्मचे रामसिंग हजारे आणि उदय कुलकर्णी यांच्याकडील अहवाल तपासले आणि यात अशास्त्रीय काही नसल्याचे स्पष्ट केले आणि छायाचित्रकार अनिल वेल्हाळ यांनी रसायनशास्त्रज्ञ, भूवैज्ञानिक यांच्या पथकाने विद्यापीठामार्फत चाचण्या केल्या. स्वतः ताकवले यांनी हजारे यांच्या पध्दतीनुसार चाचण्या घेतल्या आणि नमुने घेतले. हा अहवाल तत्कालिन राज्यपाल, राष्ट्रपतींसोबतच तत्कालीन प्रभारी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि केंद्रीय खाणकाम मंत्री श्रीपाद नाईक यांना सादर केला होता.

### मान्यवरांची साथ

या प्रवासात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, तत्कालीन केंद्रीय मंत्री मधु दंडवते, राज्यातील नेते दिग्विजय खानविलकर, गोपीनाथ मुंडे, उध्दव ठाकरे, शिवाजी विदयापीठाचे कुलगुरु डॉ. द. ना. धनागरे, शासकीय कर्मचारी संघटनेचे मारुतराव वायंगणकर, गोखले महाविद्यालयातील भूगर्भशास्त्रज्ञ डॉ. प्रभू आदींची साथ मिळाली होती. इंदिरा गांधी यांच्याकडील पत्रव्यवहारांमुळे कांही काळ लोहखनिजांची निर्यातही बंद झाली होती.

03 DEC 2022
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सिंधुदुर्गात सोन्याच्या खाणी

## केंद्रीय खनिकर्मचा अहवाल : सिंधुदुर्गसह चंद्रपुरात शोधकार्य सुरू

**सिंधुदुर्ग, चंद्रपूरमध्ये सोन्याच्या खाणी असल्याचे उघड झाले आहे. राज्याच्या भूगर्भात कोळसा, बॉक्साईट, लोह या खनिजासह सोनेही दडल्याची माहिती समोर आली आहे. चंद्रपूरच्या मिंझरी आणि बामणी भागात सोन्याच्या खाणी असल्याचा अहवाल केंद्रीय खनिकर्म विभागाने दिला आहे. याबाबत राज्याच्या खनिकर्म विभागाच्या सूत्रांनी माहिती दिली आहे. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही याबाबत खुलासा केला होता. त्यामुळे महाराष्ट्रात खरंच सोन्याच्या खाणी आहेत का, याबाबत खनिकर्म विभागाने चाचणी सुरू केली आहे.**



प्रतिनिधी
चंद्रपूर

राज्यात सोन्याच्या खाणी असल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी खाण क्षेत्रातील संधी या गुंतवणूकदारांच्या परिषदेत केला होता. राज्यात सोन्याचे दोन ब्लॉक असल्याची माहिती केंद्रीय अधिकाऱ्यांनी दिली आहे. आमच्या काळात हे सोने निघाले तर ती राज्यासाठी मोठी उपलब्धी असेल. राज्यात खनिकर्म क्षेत्राला खूप मोठा वाव असून गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात देशातील सर्वात मोठा स्टील प्रकल्प सुरू करू शकतो असा विश्वास आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

दरम्यान, राज्याच्या भूगर्भात कोळसा, बॉक्साईट, आयर्न यासारख्या खनिजांबरोबर सोनेही लपले आहे. चंद्रपूरसह कोकणातील सिंधुदुर्गातही सोन्याच्या खाणी असण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने तिथेही खनिकर्म विभागाने चाचणी सुरू केली असल्याची माहिती समोर येत आहे.

पान ९ पहा

## सिंधुदुर्गात वीस वर्षांपूर्वी झाले होते संशोधन

- येथील मातीत सोन्याचा अंश असल्याचे स्पष्ट
- आता उत्सुकता नेमके कुठे आहे सोने?

प्रतिनिधी
सावंतवाडी

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मायनिंगचे ६० हून अधिक प्रकल्प प्रस्तावित आहेत. सध्या जिल्ह्यात रेडी, कळणे, साटेली येथे मायनिंग प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पात मोठ्या प्रमाणात आयर्न आढळते. त्याची निर्यात प्रामुख्याने चीनमध्ये होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यात भूगर्भात सोन्याचा अंश असल्याचे कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या भूगर्भ विभागाच्या संशोधनात वीस वर्षांपूर्वी स्पष्ट झाले होते. मात्र यासंदर्भात शासकीय पातळीवर कधीच दुजोरा देण्यात आला नव्हता. उलट अशा शक्यता फेटाळण्यात येत होत्या. मात्र मुंबईत शुक्रवारी मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या खाण क्षेत्रातील संधी व गुंतवणूकदारांच्या परिषदेत त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

सिंधुदुर्गातील भूगर्भातील मातीत सोन्याचा अंश आहे. येथील खाणकामाच्या माध्यमातून हे सोने परदेशात जात असल्याचा आरोप होत होता. देशाच्या संपत्तीची लूट होत असल्याचेही म्हटले जात होते. त्यामुळेच या मायनिंग प्रकल्पांना विरोध होता.

## सिंधुदुर्गात सोन्याच्या खाणी

पान १ वरुन

दरम्यान, चंद्रपूर येथील गोंडपिपरी तालुक्याच्या भूगर्भात मौल्यवान प्लॅटिनम, सोने आणि दुर्मिळात दुर्मीळ म्हणून ओळखले जाणारे रुथेनियम, रेडिअम, इरेडिअम धातू असल्याचे १० वर्षांपूर्वी झालेल्या एका संशोधनातून समोर आले आहे. आता सोने खाणीचे ब्लॉक सापडल्याने याला अधिक दुजोरा मिळाला आहे.